# प्रकरण पहिले

# दलित आत्मकथन स्वरूप विशेष

# प्रकरण पहिले

# दलित आत्मकथन स्वरूप-विशेष

१.१ प्रास्ताविक

१.२ विषयाचे महत्त्व

१.३ दलित शब्दाची संकल्पना

१.४ दलित जाणीव, स्वरूप

१.५ दलित साहित्य

१.६ दलित साहित्य प्रेरणा, स्वरूप, प्रयोजन

१.७ दलित आत्मकथन स्वरूप विशेष वाटचाल

१.८ दलित स्त्रियांची आत्मकथने

१.९ सारांश

-----

# प्रकरण पहिले

# दलित आत्मकथन स्वरूप-विशेष

## १.१ प्रस्तावना :

मराठी साहित्यात १९६० नंतर दलित साहित्याचा एक जोमदार व जोरकस साहित्यप्रवाह उदयाला आला. बाबासाहेब आंबेडकर हे या साहित्याचे प्रेरणास्थान होते. हजारो वर्षे पिढ्यान्पिढ्या सोसत आलेल्या दैन्य, दु:ख, दारिद्रय, अन्याय, अत्याचार यापासून स्वत:ला स्वसमाजाला मुक्त करण्यासाठी संघर्षप्रवण झालेल्या समाजाचा उद्धार म्हणजे दलित साहित्य होय. या समाजाला 'अस्तित्व' आणि 'अस्मिता' या दोहोंच्या जागृतीसाठी संघर्षप्रवण करणाऱ्या बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' हा संदेश दिला व या विचारातून दलित साहित्य उगम पावले.

गेल्या चार दशकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान घेऊन दलित साहित्याची विविध वाङ्मयप्रकारातून निर्मिती होताना दिसत आहे. 'मानवमुक्ती', 'स्वातंत्र्य', 'समता', 'बंधुता', 'न्याय' यांचा पुरस्कार करत दलितांच्या जीवनात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानसिक पातळीवर परिवर्तन घडवून आणण्यासाठी सम्यक क्रांती करणे गरजेचे होते. त्यासाठी इथल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरूद्ध सवर्णांच्या कडून होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूद्ध, पारंपरिक व्यवसाय पद्धतीविरूद्ध विद्रोह आणि नकार यांची भूमिका घेऊन शोषित, पीडीत 'माणूस' केंद्रवर्ती मानून दलितांच्या मुक्तीचा, मानवमुक्तीचा, दलित जाणीवेचाअविष्कार करत दलित साहित्याची वाटचाल होत राहिली. जीवनविषयक जाणीवा आणि समूह जाणीवा यामुळे या साहित्याला वेगळेपण प्राप्त होताना दिसते.

कविता, कथा, कादंबरी, आत्मकथन, नाटक, ललितलेखन या विविध वाङ्मयप्रकारातून या साहित्याची होत असलेली सकस निर्मिती लक्षात घेता आज दलित साहित्य ही मराठी साहित्याची मध्यवर्ती धारा होताना दिसत आहे.

इतिहासाची चिकित्सा, वर्तमानाचा प्रत्यक्ष व भविष्याचा वेध ही तीन सूत्रे दलित साहित्यात प्रामुख्यानेदिसतात. दलित साहित्य निर्मितीने भारतीय साहित्याला एक नवे अनुभवक्षेत्र, एक नवी वाङ्मयीन दृष्टी, एक नवी अभिरूची, एक नवी भाषा व सामाजिक संदर्भ बहाल केले. म्हणून दलित साहित्याचे सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन मूल्य आता स्वकारले जाऊ लागले आहे. त्यात आत्मचरित्रासारख्या सोप्या व भूतकाळातील आठवणी जागवणाऱ्या साहित्यप्रकाराकडे दलित लेखक लेखिका आकृष्ट झाल्या. पुरूष लेखकांनी लिहलेली आत्मकथने विपुल असल्यामुळे त्यांच्या विषयात तोचतोपणा व पुनरावृत्ती हे दोष जाणवूलागले. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांच्या बाबतीत तसे घडले नाही. अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत त्यांची संख्या आहे. शिवाय लेखिकेच्या भिन्न स्वभावधर्मामुळे त्या आत्मकथनांमध्ये वेगळेपणा आहे. म्हणून 'शांताबाई कृष्णाजी कांबळे' यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' व 'बेबी कांबळे' यांच्या 'जिण आमुचं' ह्या दोन आत्मकथनांतील वेगळेपण आणि त्यांचे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व स्पष्ट करण्यासाठी या दोन आत्मकथनांचा अभ्यास करण्याचे योजिले आहे.

## १.२ विषयाचे महत्त्व :

दलित आत्मकथने ही दलित जीवनाचा सामाजिक दस्तऐवज आहेत. येथील प्रथा-परंपरा, रूढी, व्यथा, वेदना इ. बाबींचे चित्रण वेगळ्या स्वरूपात मांडले गेले. आतापर्यंत दलित आत्मकथनांवर साधक बाधक चर्चेबरोबर समीक्षाही

झालेली आहे. दलित आत्मकथनांतील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब म्हणजे सामाजिकता व सांस्कृतिकता यांचा सखोलपणे विचार करण्याचे ठरवले आहे.

दलितांना 'माणूस' म्हणून जगण्याचे हक्क नाकारले गेले व त्याही पलीकडील मरणप्राय जीवन दलित स्त्रीच्या वाट्याला आले. दलित स्त्रीच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, दु:ख, वेदना यांचा अविष्कार सुशिक्षित स्त्रियांनी लेखनबद्ध केला आणि इथल्या विषमताधिष्ठित सामाजिक वास्तवाचे चित्र या लेखिकांनी प्रभावीपणे यामध्ये मांडले. यामध्ये 'अंत:स्फोट', 'माज्या जल्माची चित्तरकथा', 'मरणकळा', 'जिणं आमुचं' यांचा समावेश आहे. यामधून या लेखिकांचे जीवनवास्तव प्रतिबिंबित झालेले दिसते. दलित जीवनाचा तोच अंत:स्फोट, तिच उपेक्षा, तिच मानहानी, तेच नरकप्राय गृहजीवन प्रत्येकीच्या वाट्याला आलेले दिसते. 'दलितांमधील दलित' व 'गुलामांची गुलाम' म्हणून पिडल्या गेलेल्या स्त्रीजीवनाचे वास्तवाचे चित्रण या आत्मकथनांमधून दिसते. स्त्रीलिखित आत्मकथनांचा विशेष हा की, असुरक्षित अशा सामाजिक व सांस्कृतिक वास्तवात कुटुंबाचे रक्षण करणारी ही स्त्री मुलगी, पत्नी, माता व एक समाजातील घटक या विविध नात्यांनी चित्रित होते. या विविध नात्यांतून दलित स्त्रीचा जीवनपट तिच्या आत्मकथनांद्वारे सामाजिक वास्तवता व सांस्कृतिकता यांचा अचूक वेध व अर्थ घेणारा दिसून येतो.

'माज्या जल्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुच' या दोन आत्मकथनांची निवड यासाठी केलेली आहे की, दलित आत्मकथनांच्या दालनांमध्ये स्त्रीलिखित आत्मकथनांचे दालन आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने वेगळे आहे व तिची वेदना व्यथा, रूढी, परंपरा तिच्या वाट्याला आल्याने सामाजिक व्यवस्थेची ती कशी बळी पडली आहे याचेही चित्रण इथे अपेक्षित आहे. दलित स्त्रीने आपल्या स्वबळाचा घेतलेला शोध हा एक सामाजिक निष्ठेतून अथवा सामाजिक बांधिलकीतून प्रेरित झालेला आहे का ? तसेच आत्मकथनांतून जाणारी आत्मशोषणाची एक दिशा

आणि दूरस्थ भूतकाळातून वाट काढणारी त्यांची दुसरी दिशा शेवटी दलित मनाला नेमके कुठे घेऊन जातात ? दलित अस्मितेच्या शोधात एक सुसंस्कृत आधुनिक मनही आहे. या मनाचा शोध ह्या आत्मकथनांतून घेतला आहे का ? इ. प्रश्नांचा विचार इथे अभिप्रेत आहे. तसेच दलित आत्मकथनांतून अभिव्यक्त होणारा भूतकाळ व आजचे दलित जीवन यांचा अनुबंध तपासणे व दलित आत्मकथनंही येथल्या संस्कृतीचा आलेख मांडणारी आहेत असे म्हटले जाते. ते कितपत योग्य आहे. याचाही अभ्यास या अनुषंगाने करावयाचे ठरवले आहे. या अनुषंगाने स्वरूप, विशेष व वाटचाल यांची सखोल चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते.

आता या अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्ही आत्मकथनांतील सामाजिकता व सांस्कृतिकता यांची चिकित्सा करावयाची आहे. त्यासाठी प्रथमत: दलित कोणाला म्हणावयाचे, दलित जाणीवेचे स्वरूप आणि दलित साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप याचा विचार करू.

## १.३ दलित शब्दाची संकल्पना :

दलित साहित्यनिर्मिती हा राजकीय सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचा एक परिपाक आहे. 'दलित' या संज्ञेचा उल्लेख मात्र तसा मागील काळापासून आढळतो. श्री. पां.नां. राजभोज याअस्पृश्य पुढाऱ्याने १९२८ साली काढलेल्या पाक्षिकाला 'दलितबंधू' असे नाव दिले आहे. १९०६ साली 'विठ्ठल रामजी शिंदे' यांनी Depressed Class Mission नावाची संस्था काढली होती. त्यातील 'Depressed' या शब्दावरून 'दलित' ही संज्ञा मराठीत आली असावी असा एक अंदाज येतो. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र 'Depressed' या शब्दाचा कधी वापर केला नाही. या संदर्भात ते 'Non Caste Hindus' किंवा 'Protestant Hindus असा शब्दप्रयोग करत असत. स्वातंत्र्य, समतेच्या, न्यायाच्या प्रेतावर पाय ठेऊन

केवळ स्वार्थाखातर माणुसकीची बेअब्रू त्यांनी केली. ते वजा जाता उरलेले सर्व दलित असे म्हटले जाते. या शब्दाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे –

**दलित शब्दाच्या काही व्याख्या :**

- 'दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे रेटलेला सामाजिक वर्ग आहे'[१] – लक्ष्मणशास्त्री जोशी.
- 'दलित या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजिवी आहेत ते सर्व दलित या व्याख्येत समाविष्ठ होतात'[२] – म.ना. वानखेडे
- 'दलित म्हणजे अनुसूचित जातीजमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी.'[३] – नामदेव ढसाळ.
- 'गेली हजारो वर्षे जातिसंस्थेने जखडला गेल्यामुळे भारतीय समाज माणुसकीला पारखा झाला आहे. चातुर्वर्ण्याच्या संकल्पनेचा आधार घेऊन आणि जातिव्यवस्थेच्या मार्फत येथील मूठभर सत्ताधारी वर्गाने भारतातील बहुसंख्य दलितांची सतत वंचना केली आहे. आणि या दलितांचे सवर्गांचे शोषण केले आहे.[४] – युक्रांद
- 'शोषितांची जात शोषित. शोषणाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इ. सर्वच प्रकारांनी काळोखलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे दलित होत.'[५] – यशवंत मनोहर.

या व्याख्यांवरून आपल्या असे लक्षात येते की दलित हा शोषित आहे. उच्चवर्णियांनी त्यांचे बिनधास्त शोषण केले आहे. आत्मा, ईश्वर, कर्मविपाक ही

त्यांची शोषणाची साधने आहेत. म्हणजेच स्वातंत्र्य संधी, समता यांच्या अभावी माणुसकीच्या मूलभूत हक्कांना पारखा झालेला कुठलाही मानव हा दलित होय.

## १.४ दलित जातीय स्वरूप :

'दलित जाणीव' ही मराठी साहित्याच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण जाणीव आहे. दलित जातीवेधी स्वरूपनिश्चिती करण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केलेला आहे. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी दलित जाणिवेचे स्वरूप पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

''विवक्षित सामाजिक वास्तव, त्याची सुस्पष्ट कारणमीमांसा व त्या वास्तवाच्या परिवर्तनाचा आशावादी दृष्टिकोन हा दलित दृष्टिकोण होय. दलित दृष्टिकोन व त्याबद्दलची तीव्र आस्था म्हणजे दलित जाणीव.''[६] त्यांनी दिलत जाणीव अजूनही एका प्रकारे सांगितली आहे ते म्हणतात, ''दलित जाणीव ही समाज जाणीवेत अनुरूप परिवर्तन करू पहाणारी जाणीव आहे. म्हणून ती जशी विद्रोहात्मक तशीच मूलत: आशावादी व क्रांतिकारी जाणीव आहे.''[७]

दलित संवेदनशीलतेचा विचार गो.पु. देशपाडं यांनीही केला आहे. ''नागर संवेदनेच्या पलीकडे एक दलित संवेदना आहे. ह्या दलित संवेदनाशीलतेला जाणवणारे वास्तव स्वाभाविकपणेच भिन्न असणारे आहे. दलित साहित्यचे वेगळेपण ह्या दलित संवेदनशीलतेमुळे आहे. मराठी साहित्यात ही संवेदनशीलता नवी आहे. याप्रकारे दलित संवेदनशीलतेचे वगळेपण व नवीनत्व सांगून त्यांनी या संवेदनशीलतेचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते दलित संवेदनशीलता कृष्णसंवेदनाशीलते प्रमाणेच दलित संघर्षाशी जोडलेली आहे.''[८]

दलित जाणिवेचे मराठीत ज्याच्या वैचारिक लेखनातून स्पष्ट प्रकटन झाले त्या लेखकाचे नाव 'बाबुराव बागूल' असे आहे. त्यांनी केलेली दलित जाणिवेची

व्याख्या पाहूया. ''नकार, विद्रोह, मानवमध्यवर्तीत्व, अनात्मवाद, अनीश्वरवाद, गतिवाद, ज्ञानविज्ञान आणि त्यांच्या योग्य उपयोगासाठी सत्ता, अर्धसत्ताच दलितांच्या हातात असणे ही सम्यक क्रांतीची सूत्रे आहेत. हीच दलित जाणीव होय.''[९]

नरहर कुरूंदकर यांनी दलित जाणीव थोड्या वेगळ्या शब्दात पुढीलप्रमाणे मांडली आहे. ते म्हणतात, ''दलित साहित्य ही केवळ वाङ्मयीन चळवळी नाही तर ती एक जीवनदृष्टी आहे.''[१०] प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य प्रतिष्ठा आणि भीतीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे अशा भूमिकेवरून निर्माण झालेली एक जीवनदृष्टी वाङ्मयात अभिव्यक्त होत असते ती जीवनदृष्टी म्हणजे दलित जाणीव.

वरील व्याख्यांचा विचार केला असता आपल्याला काही गोष्टी लक्षात येतात. दलित जाणीव विद्रोहात्मक आशावादी व क्रांतिकारी आहे. ही जाणीव मराठी साहित्यात स्वयंभू, स्वतंत्र व नवीन आहे व संघर्ष हा तिचा प्राण आहे. ईहवादी, नैतिकतावादी, निरिश्वरवादी, अनात्मवादी व मानवाला केंद्र कल्पिणारी न्यायवादी अशी ही जाणीव आहे.

दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार होय. आशावादी दृष्टिकोन, दलित जीवनाची दु:खे तत्परतेने टिपण्याची प्रवृत्ती तसेच सामाजिक बांधिलकीशी असणारे अतूट नाते म्हणजे दलित जाणीव होय. हीच जाणीव दलित सहित्याचा मूलाधार आहे.

## १.५ दलित साहित्य :

दलित म्हणजे काय ? दलित जाणीव म्हणजे काय ? याचा विचार झाल्यावर दलित साहित्य म्हणजे काय ? याचा विचार थोडक्यात करू. दलित जाणिवेची अभिव्यक्ती ज्यात आहे ते दलित साहित्य अशी ढोबळ व्याख्या करता

येईल. दलित साहित्य ही घटना दलित विश्वाच्या, शोषितांच्या, जगाच्या स्वातंत्र्याची आणि न्यायाची सनद आहे. प्रस्थापितांच्या सगळ्या शोषक मुल्यव्यवस्थेच्या दहनाचा तो जाहीरनामा आहे. ही दलित जाणीव ज्या लेखनातून, जीवनचित्रणाच्या माध्यमातून व्यक्त होते त्या लेखनाला दलित जाणीवेचे साहित्य म्हटले जाते. दलित साहित्याच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे -

'ज्या साहित्याला सम्यक परिवर्तन अभिप्रेत आहे व जे साहित्य क्रांतीचा सामोरे जाते ते दलित साहित्य'[११] - बाबुराव बागूल

''दलितांची समस्या म्हणजे मानवी स्वातंत्र्याची समस्या होय. दलितांच्या समस्येचा प्रत्यय आल्याशिवाय मानवी स्वातंत्र्याच्या समस्येचा अर्थ समजणार नाही. असा हा व्यापक प्रत्यय साहित्याच्या मुळाशी असतो. ते साहित्य दलित साहित्य जसे असते तसे ते मानवाचेही साहित्य असते.''[१२] - लक्ष्मणशास्त्री जोशी.

''दलित साहित्य हा मराठी ललित साहित्याच्या मूळ प्रवाहापासून सुटून व तुटून बाहेर फुटू पाहणारा व आपला वेगळा सवतासुभा निर्माण करणारा कोणता जातीयवादी संकुचित संप्रदाय नसून, शतका-शतकातून संकुचित होऊन राहिलेल्या व स्वत:ची कोंडी करून घेऊन प्रवाहशून्य, अगतिक व जीवन पराड:मुख झालेल्या मराठी साहित्याचे साचलेले व थिजलेले डबके फोडून त्याला साहित्य विशाल व गतिमान ठरू पहाणारा हा क्रांतिकारी संप्रदाय आहे.''[१३] - प्र.श्री. नेरूरकर

वरील तीन व्याख्या पाहिल्या असता असे लक्षात येते की, दलित समाजात जन्माला आलेल्या व दलितवर्गाची पिळवणूक त्यांचा विविध स्तरावर होणार पाशवी छळ व त्यांचे माणुसकीला मुकलेले जीवन, यांचा प्रत्यक्ष व जिवंत अनुभव घेणाऱ्या दलित वर्गातील साहित्यिकांनी मराठीत पहिल्यांदा केलेला प्रक्षोभक, विद्रोही अविष्कार म्हणजे दलित साहित्य. मानवी स्वातंत्र्य ही या जाणीवेमागील

प्रेरणा आहे. ते तिचे मूल्य आहे. वर्णव्यवस्थेमुळे, विशिष्ट मानसिकतेमुळे दलित जीवनाची जी कोंडी झाली जे मूल्यहीन जीवन वाट्याला आले त्याचा शब्दबद्ध अविष्कार म्हणजे दलित साहित्य.

## १.६ दलित साहित्य प्रेरणा व स्वरूप, प्रयोजन वैशिष्ट्ये :

प्रास्ताविकात प्रारंभी दलित साहित्याची प्रेरणा स्वरूप याविषयी थोडे विवेचन केले आहे. येथे थोड्या अधिक विस्ताराने माहिती घेऊ. दलित साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू केवळ मनोरंजन हा नाही. त्याचा हेतू स्वत:ला आणि स्वत:च्या समाजाला पारंपरिकतेच्या मगरमिठीतून बाजूला करणे, सोडवणे हा आहे. त्यामुळे दलित साहित्यातून सामान्यत: भावनाभिव्यक्तीला फारसे स्थान नाही. त्यापेक्षा विचारप्रवणतेवर जास्ती भर आहे. हे विचारच दलित साहित्यात भावनेचे रूप धारण करतात. दलित साहित्याच्या प्रेरणास्तोत्र तथागत गौतमबुद्ध, म. ज्योतिराव फुले, कार्ल मार्क्स मानले जातात. परंतु प्रेरणास्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत.

बौद्ध विचार हा सामाजिक क्रांतीचा आणि परिवर्तनाचा विचार आहे. एकूण बौद्ध तत्त्वज्ञानच बुद्धिवाद आणि तर्क यांच्या कसोटीवर आधारलेले आहे. या तत्त्वज्ञानात समतेला महत्त्व दिलेले आहे. तसेच व्यक्तीचे स्वातंत्र्य, शांतीत अहिंसा आणि सत्य यांनाही महत्त्व आहे.

कार्ल मार्क्सने साम्यवादाचा पुरस्कार केला. त्याच्या मते साम्यवादामुळे समाजातील सर्व स्त्री-पुरूषांना आपल्या विकास साधता येतो. मात्र त्यासाठी शोषकांविरूद्ध संघर्ष करावा लागतो. त्याशिवाय शोषितांवरील अन्यायाचे उच्चाटन होत नाही. दलित साहित्यातून आढळून येणारा नकार आणि विद्रोह म्हणून मार्क्सच्या आदर्श समाजव्यवस्थेचा कल्पनांना मूर्तरूप देण्यासाठी चालविलेल्या संघर्षाची

प्रधानसूत्रे होत. दारिद्र्य आणि भूक यांचे चित्रण दलित साहित्यात मोठ्या प्रमाणात येते. याला मूळ कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेली मार्क्सची विचारसरणी.

म. फुलेंनी हिंदू धर्मातील मानसिक व सामाजिक गुलामगिरीविरूद्ध बंड केले. शिक्षण, समानता व सर्वांना समान संधी यासाठी त्यांनी हे बंड केले. समता, बंधुत्व यांचा त्यांनी पुरस्कार केला.

दलित साहित्य हे ईश्वर, आत्मा, कर्मविस, अध्यात्म, वर्ण आणि जातिव्यवस्था यांना नकार देते. ते हिंदू परंपरा, रूढी वाईट चालीरिती यांच्याविरूद्ध बंड पुकारते. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमधून आलेला आहे. त्यांनी दलितांना बलुतेदारी सोडून स्वतंत्र जीवन जगण्याचा उपदेश केला. दलितांच्या मनात आत्मसन्मान, आत्मविश्वास, स्वावलंबन यांची जाणीव करून दिली. परंपरा, पोथीनिष्ठता, परमेश्वरविषयक कल्पना यांना नकार देण्यास सांगितले. जो धर्म वर्तमान समृद्ध करण्यासाठी माणसाला प्रोत्साहन देतो, जो त्याच्या मनात आशा पल्लवित करतो व फुलवितो तोच खरा धर्म होय. ज्या धर्मात माणसाच्या विकासाला वाव नाही तो धर्म नसून निव्वळ फसवणूक आहे अशी शिकवण दिली. लोकशाही, समाजवाद आणि बुद्धविचारप्रणाली हाच आंबेडकरी विचारांचा गाभा आहे आणि दलित साहित्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान मोठ्या प्रमाणात येते. याचे कारण तेच त्यांचे अधिष्ठान आहे.

समाज सुधारला म्हणजे अस्पृश्यता नष्ट झाली, असे होत नाही. केवळ समाज बदलून चालणार नाही. भौतिक सुख मिळाले म्हणजे सर्वंकष परिवर्तन झाले असे होत नाही. त्यासाठी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व मानसिक स्तरावर परिवर्तन घडून येणे आवश्यक आहे. यासाठी सम्यक क्रांती व्हावी लागते.

ती घडवायची असेल तर विद्रोहाची गरज आहे. म्हणून दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते. माणसांच्या शत्रूंशी, माणसाला कमी लेखणाऱ्या व्यवस्थेविरूद्धचा हा विद्रोह आहे. म्हणून दलित साहित्याला विद्रोही साहित्य म्हटले जाते.

दलित साहित्य अज्ञान, दारिद्रय, पिळवणूक यांना नकार देते. वर्णव्यवस्थेमध्ये, जातीव्यवस्थेमध्ये माणसाचे अवमूल्यन होते. म्हणून या साहित्याने वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था नाकारली आणि माणूस महान आहे हे सूत्र स्वीकारले. ते माणसाला केंद्रबिंदू मानते. त्याची बांधिलकी मुनष्यत्वाची प्रतिष्ठा मानवाच्या तत्वप्रणालीशी आहे मग ही तत्वप्रणाली म. फुले यांची असो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची असो किंवा मार्क्सची असो. स्वातंत्र्याबरोबरच बंधुता, समता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये दलित साहित्याने स्वीकारली.

थोडक्यात सांगायचे म्हणजे, आत्मोद्धार हेच दलित साहित्याचे प्रयोजन आहे. शेकडो-हजारो वर्षे पिढ्यान्‌पिढ्या सोसत आलेल्या दैन्य, दु:ख अन्याय अत्याचार यापासून स्वत:ला, समाजाला, मुक्त करण्यासाठी संघर्ष सिद्ध झालेल्या समाजाचा उद्‌गार म्हणजे दलित साहित्य. दलितांची आत्मकथने याला अपवाद नाहीत.

दलित साहित्याचा विचार करता काही वैशिष्ट्ये प्रखरपणे दृष्टीपथास येतात. ती पुढीलप्रमाणे -

दलित साहित्याच्या जन्मामागे वेगळेपणाची प्रखर जाणीव आहे. तात्विकदृष्ट्या ही जाणीव अधिक भावनाप्रधान आहे. पण तरीही ती जाणीवच दलित वाङ्‌मयाच्या वाढीला पोषक आहे. दलित जाणिवेचे वाङ्‌मय म्हणूनच प्रस्थापित साहित्यात आपल्या प्रवृती-धारणा व प्रकृतिधर्माने विशेष ठरते.

दलित साहित्य सामाजिक बांधिलकी असलेले साहित्य आहे. जीवननिष्ठा कोणत्याही साहित्याला ही बांधिलकी असते, असावी. सामाजिक बांधिलकीची संकल्पना स्वीकारणारे हे साहित्य इथे संपूर्ण दलित समाजाचे प्रतिनिधित्व करते. म्हणून जीवनवादी समाजाभिमुखता त्याचे विशेष स्वरूप समजले जाते.

व्यक्तीच्या समाजसंबंधित्वाशी निगडीत असलेल्या व्यक्तिगत जीवनातील भावनानुभूतींचा उत्कट अभिव्यक्तीत आढळते. नकळतपणे त्यात कधी प्रचारीपणाही येतो. कल्पनेने उजळ माथ्याने प्रचारकी भूमिका स्वीकारली तर तिच्यामध्ये फार मोठी कृतिप्रेरक शक्ती निर्माण होते. यात शंकाच नाही. अशी कला समाजाच्या विचारांना आणि भावनांना हात घालत नाही तर ती त्याला विशिष्ट दिशेने कार्यप्रवृतही करते. दलित साहित्याच्या संदर्भात याचा अनुभव येतो. कारण दलितांच्या सामाजिक चळवळीशी या साहित्याची नाळ बांधली गेल्यामुळेहँ त्यातील प्रचारकीपणा अधिकच उठून दिसतो. मात्र हा प्रचारकीपणा माणुसकीसाठी, मानवमुक्तीसाठी, न्यायसमतेसाठी, स्वातंत्र्याच्या आकांक्षा पूर्ततेसाठी एकूण दलित साहित्य हे सुंदर जीवनाची व ते सुंदरपणे जगण्याची प्रेरणा देणारे वाङ्मय आहे.

दलित साहित्य सामाजिक चळवळीचाच एक भाग आहे. म्हणूनच हे साहित्य निर्मितीशील कलावंतांचे सृजनशील साहित्य आहे. ती एक वाङ्मयनिर्मात्यांची चळवळ आहे असे म्हटले जाते, ते बरोबर आहे.

दलित साहित्य नव्या वाङ्मयीन प्रवृत्ती व जाणिवांना उपस्थित करते. कारण तो नव्या जीवनाचा नवा उद्गार आहे. आता आपण दलित आत्मकथनाचे स्वरूप व वैशिष्ट्यांचा विचार करू.

## १.७ दलित आत्मकथन स्वरूप विशेष व वाटचाल :

१९६० नंतर दलित साहित्यिकांनी आपल्या दडपलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी 'आत्मकथन' हा मार्ग शोधून काढला. दलितांची आत्मकथने म्हणजे 'आत्मचरित्र' नव्हेत. कारण आत्मचरित्र हे वयाच्या साठीनंतर लिहिले जाते आणि ते लिहिणारा मान्यवर असतो. याउलट आत्मकथन लिहिणारा दलित तरूण तिशी-पस्तीशीचा असतो आणि समाजात 'अस्तित्वशून्य' असे आयुष्य जगणारा असतो. 'आत्मकथन' हा या तरूणाचा स्वत:च्या वेदनेला, उपेक्षेला उद्गार देण्याचा प्रयत्न असतो. आत्मचरित्रात बालपण, यौवन, प्रौढपणे, वृद्धत्व असा क्रम सांभाळलेला असतो. दलित आत्मकथनांत असा क्रम सांभाळलेला नसतो. कारण तेवढा मोठा कालपट दलित आत्मकथनांत नसतो. आणि उत्कटपणे आपली व्यथावेदना मांडताना आत्मकथनाच्या या क्रमाकडे दुर्लक्ष झालेले असते. त्यामुळे आत्मकथन मधूनच सुरू होते आणि मध्येच संपते. एकंदर दलित आत्मकथनाचे स्वरूप 'आत्मचरित्र' या वाङ्मयप्रकारापेक्षा आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगाने वेगळे आहे.

दलित आत्मकथनांत 'मी' हाच केंद्रस्थानी असतो. परंतु हा 'मी' स्वत:च्या व्यथा-वेदनांबद्दल लिहिताना त्याच्या आजूबाजूच्या त्याच्यासारख्याच इतरांचेही चित्रण करत असतो. त्यामुळे 'मी' 'आम्ही' चे समष्टीचे प्रतिनिधीत्व करतो. या विशिष्ट स्वरूपामुळेच दलित आत्मकथनांना 'स्वकथन' अशी संज्ञाही वापरलेली दिसते. दलितांनी आत्मकथने लिहिण्याची दोन कारण प्रामुख्याने दिसतात. एक म्हणजे त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडायची असते व दुसरे मुख्यत्वेकरून दलितेतरांच्या मनात पश्चाताप निर्माण व्हावा ही एक इच्छा असते. अशा दुहेरी

हेतूंनी दलित आत्मकथनाची निर्मिती झालेली असते. त्यामुळेच प्रत्येक दलित आत्मकथनांत वेदनेबरोबर विद्रोहही असतो. सर्वांनीच एकीकडे स्वत:च्या समाजाला आपल्या लाचार व आगतिक जिण्याचे भान आणून दिले. आणि दुसरीकडे व्यापक समाजव्यवस्थेतील साऱ्या उणीवा ठसठशीतपणे रेखाटून तिला शरमिंदे केले.

मराठीत आजवर सुमारे ऐंशी दलित आत्मकथने प्रसिद्ध झाली आहेत. या साऱ्या आत्मकथनांत काही गोष्टी समान आहेत. त्यांनाच दलित आत्मकथनांचे विशेष समजले जाते. आरती कुसरे-कुलकर्णी यांनी दिलत स्वकथनांची एकूण सहा वैशिष्ट्ये सांगितली ती पुढीलप्रमाणे -

अस्मितेचा शोध, सामाजिकता-सामूहिकता, प्रांजळ निवेदन, त्रिकाल दर्शन, विद्रोही प्रवृत्ती, आत्मनिष्ठा इत्यादी. विलास खोले यांनी ही वैशिष्ट्ये थोडी वेगळी नोंदवली आहेत. भूक-उपासमार, जातीव्यवस्थेची कुंपणे, जातीतील पोटजाती, अस्पृश्यतेचे अनुभव, सोशिकता, डॉ. आबेडकरांवरील .............. आरती कुसरे-कुलकर्णी व खोले यांनी नोंदवलेली दलित आत्मकथनांची वैशिष्ट्य हेच सांगतात की, दलित आत्मकथन वेदना मांडते. विद्रोहाची भूमिका घेते आणि अंतिमत: मानवतावादाची दिशा दाखवते. समाजव्यवस्थेतील जातिबंधनामुळे अन्य समाजापासून तुटलेल्या व दडपलेल्या या गटाचे व्यक्ती व समूहजीवन कोणत्या धारणेने वाहते यासंबंधीच्या चित्रणाला यात महत्त्व आहे. आपल्या निमित्ताने आपल्या समाजाच्या अस्तित्वाचाशोध त्याला घ्यावयाचा असतो. स्वत:ची जात, कुटुंब, समाज, राष्ट्र इत्यादी सामाजिक बांधिलकीतून तो लेखनाला प्रवृत्त झालेला

असतो. म्हणून रूढ आत्मचरित्रापेक्षा दलित लेखकांच्या आत्मचरित्रांचा 'स्वकथन' असे नाव दिले जाते.

'स्वकथन' या साहित्यप्रकाराची व्याख्या विविध लेखक-लेखिकांनी केली आहे. त्या व्याख्यांवरून दलित स्वकथनाचे निश्चित स्वरूप लक्षात येते. ''समाज व्यवस्थेमुळे आर्थिक व सामाजिक विषमतेतून निर्माण झालेल्या आत्मदुराव्यामुळे स्वत्वाचे भान जागृत होऊन आपल्या व आपल्या समाजाच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी व्यक्तिजीवनाच्या मर्यादेत समाजजीवनाची लक्तरे वेशीवर टांगणारे आणि 'स्व' तसेच स्वतेर जातीसमाजाचे मानसिक प्रबोधन व परिवर्तन घडवून आणण्याच्या सुप्त हेतूने लिहिलेले आत्मपर स्वरूपाचे पण रूढ आत्मचरित्राहून वेगळे साहित्यरूप स्वीकारणोर लेखन म्हणजे दलित 'स्वकथन' होय.''[१४]

आरती कुलकर्णी यांनी केलेल्या वरील व्याख्येवरून लक्षात येते की, दलित आत्मकथनांत 'मी' केंद्रस्थानी असतो. पण 'मी' च्या जीवनाला सामाजिक जीवनाचा संदर्भ असतो. 'मी' 'आम्ही' चे प्रतिनिधीत्व करतो. थोडक्यात दलित साहित्याचा दलित जाणीवेतून व त्याला असलेल्या विशिष्ट सामाजिक बांधिलकीचा दृष्टीतून विचार करता ही दलित जाणीव व्यक्तिनिष्ठ असण्यापेक्षा समतेची सामाजिक जाणीव असल्यामुळे त्याला लाभलेली प्रेरणादृष्टी ही व्यापक आणि सर्वस्पर्शी असल्यामुळे साहित्याचे क्षेत्र आपोआप एक विश्वव्यापी वर्तुळाशी संलग्न होते.

रा.ग.जाधव यांनी दलित आत्मकथनाची समर्पक अशी व्याख्या केली आहे. ते म्हणतात. ''आत्मा दुखावल्यामुळे, स्वत्वाचे भान घेऊन स्वत:च्या व स्वसमाजाला अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देण्यासाठी व्यक्तीजीवनाला मर्यादेत

समाजजीवनाची उत्तरे वेशीवर टांगणारी आणि 'स्व'व स्वेतंराचे प्रबोधन घडविण्याचे कार्य करणारे साहित्य म्हणजे दलित आत्मकथन.''[१५]

वरील व्याख्यांचा विचार करताना असे लक्षात येते, की मी कोण? आणि माझ्या जगण्याचा अर्थ काय? या प्रश्नांचा शोध प्रत्येक दलित आत्मकथनकार घेताना दिसतो. या समाजव्यवस्थेने दलितांच्या वाट्याला येणारी उपेक्षा त्यांच्या मनात परात्मभावाची जाणीव निर्माण करते. आणि त्यातूनच समाजव्यवस्थेचा नकार देणारी अस्तित्वासाठी धडपड सुरू होते. याने प्रत्यंतर प्रत्येक आत्मकथनांत दिसून येते. येथे काही महत्वपूर्ण दलित आत्मकथनांचा आढावा घेतला असता त्यातील 'जाणीव' आणि 'नेणीव' स्पष्ट होते. दलित आत्मकथनांत येणारे स्त्री-पुरूष प्रादेशिक वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. त्यामुळे प्रादेशिक भाषांचे वेगळेपण त्यातून व्यक्त होते. साठ सालच्या आसपास सुरू झालेला हा प्रवास अजूनही चालू आहे.

या प्रकरणाच्या प्रास्ताविकात आपण दलित साहित्याचे स्वरूप थोडक्यात पाहून दलित आत्मकथनांची वाटचाल पहाणे क्रमप्राप्त ठरते. साठ सालच्या आसपास औरंगाबादचे मिलिंद महाविद्यालय नव्यावाङ्मयीन जाणिवेचे केंद्र बनले होते. त्यातील 'अस्मितादर्श' या यितकालिकातून आत्मकथनपर लेख लिहिले गेले. या आत्मकथनकाराचे नाव होते. 'प्र.ई. सोनकांबळे' अशाप्रकारे १९७९ मध्ये ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. तेव्हा दलितांच्या अनुभवांना कथनाचा नवा फॉर्म मिळाला त्याच्या आधी थोडे महिने 'बलुतं' प्रसिद्ध झाले. यातून दया पवार यांनी आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या नव्या रूपबंधाची मांडणी केली.

'आठवणींचे पक्षी' आणि 'बलुतं' मुळे अनेक जनसमूहातील लेखकांना आत्मप्रकटीकरणाची दिशा मिळाली. 'माधव कोंडविलकर' यांनी 'मु.पो. देवाचे

गोठणे' हे आत्मकथन लिहिले. चांभारकीच्या गोष्टी बाहेर आल्या म्हणून जातीतील लोक रागावले व वास्तवाला रूप दिले. म्हणून स्तुतीही झाली. दैनंदिनीच्या स्वरूपात लेखन करून आत्मकथनाचा एक नवा बंध त्यांनी हाताळला. 'बलुतं', 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथांमधून गावकुसाबाहेरील जीवनानुभव व्यक्त होत असताना इतर जातींनाही जाग येऊ लागल्याचे उदाहरण म्हणजे, लक्ष्मण माने यांचे १९८० साली लिहिलेले 'उपरा' हे पुस्तक होय. भटक्या विमुक्त जमातीतील 'कैकाडी' जनसमूहाच्या जीवनाचे अन् जगण्याचे अनुभवकथन त्यात आहे. पिढ्यान्पिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन 'गाढवाच जिणं' जगणाऱ्या मंडळींच्या वेदनांना लेखकाने उद्गार दिला. उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोटं' या आत्मकथनांत मात्र आत्मकथनकार सजग आहे. मातंग समाजाच्या दु:खभोगाची चित्रे त्या समाजाच्या जीवनातील आगतिकता, माणुसकी, अमानुषता, कारूण्य, जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष इत्यादींचे दर्शन त्यात आढळते. शरणकुमार निंबाळे यांच्या 'अक्करमाशी' व 'बारामाशी' या आत्मकथनांतील वेगळेपणाने, दाहकतेने वाचकांना विचार करायला प्रवृत्त केले. 'गबाळं' या आत्मकथनांत दादासाहेब मोरे यांनी भटक्या विमुक्त जमातीबरोबर 'कुडमुडे जोशी' या जमातीचा वेध घेणारे प्रभावी आत्मकथन लिहिले. 'गावकी' या आत्मकथनांत रूस्तुम आचलखांब यांनी दलित ग्रामीण संस्कृतीचे चित्रण करण्याबरोबरच, अस्पृश्यांना कराव्या लागणाऱ्या गावकीच्या कामाचे साद्यंत चित्रण केले. 'उचल्या' या आत्मकथनांत गुन्हेगारी व भटक्या जमातीची तपशीलवार माहिती लक्ष्मण गायकवाड यांनी मांडली. 'आभरान' यामध्ये पार्थ पोकळे यांनी दलित समाजातील पोतराजांची जीवनगाथा मांडली. 'झळा' या आत्मकथनांतही ल.स. रोकडे यांनी अस्पृश्याच्या गावकीच्या

कामातील दु:खभोगाचा आलेख मांडणारे चित्रण केले आत्माराम राठोड यांच्या 'तांडा' या आत्मकथनांत 'लमाण वंजारा जमातीतील श्रद्धा, भांडणतंटे, पंचायत, दैववाद त्या जमातीचे समूहजीवन यांचे चित्रण आढळते. भीमराव गस्ती यांचे 'बेरड' हे आत्मचरित्र 'बेरड' समाजाच्या भोगवट्याची व्यथा मांडणारे आत्मकथन आहे. शंकरराव खरात यांचे 'तराळ-अंतराळ' हे आत्मचिरत्र मात्र खऱ्या अर्थाने 'आत्मचरित्र' ह्या रूढ प्रकारात मोडते. एका तराळाचा मुलगा आपल्या कर्तृत्वाने विद्यापीठाच्या उच्चपदी पोहोचतो. यात बालपणापासून, उच्चपदापर्यंतचा खरातांचा प्रवास दिसून येतो. 'कोल्हाट्याच पोर' हे गेल्या शतकातील गाजेले आत्मकथन कोल्हाटी समाजाचे. कलावंतिणीच्या जगताचे भोगवटे किशोर शांताबाई काळे यांनी मांडले आहेत.[१]

## १.८ दलित स्त्रियांची आत्मकथने :

दलित आत्मकथनांत स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांचीही मोलाची भर पडली आहे. दलित स्त्रियांनीही आत्मकथन सदृश्य या लेखनप्रकारातून आपले अनुभवविश्व, जीवनजाणीवा चित्रित केलेल्या आहेत. 'दलित स्त्री' म्हणजे दलितांहूनही दलित, कुटुंब व समाज अशा दोन्ही पातळीवर भरडल्या गेलेल्या स्त्रीला अपार दु:ख दैन्य, उपासमार सहन करावी लागली. १९८१ मध्ये कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट' हे लेखसंग्रहाच्या रूपात प्रसिद्ध झालेले आत्मकथन वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रा. कुमुद पावडे यांचे सामाजिक विचार सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने मोलाचे आहेत. दलित जीवन आणि शतकानुशतकाच्या जीवनपद्धतीतून बाहेर परिवर्तनाच्या दिशेने निघालेल्या दलित स्त्री मनाचे अंतरंग 'अंत:स्फोट'मधून व्यक्त होते.

विशेष लक्ष वेधून घेतले ते शांताबाई कृष्णाजी कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' आणि बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुच' या आत्मकथनांनी. दलित स्त्रीच्या बाबतीत सार्थपर्ण म्हटले जाते की, दलित स्त्री ही दलितामधील दलित आहे. याचा प्रत्यय या आत्मकथनांमधून येतो. शांताबाई कांबळे यांनी पारंपरिक व्यवस्थेविरूद्ध बंड केले इतकेच नव्हे तर पुरूषप्रधान व्यवस्थेतील नवरेशाही विरूद्ध बंड केले. एक दलित स्त्री जिद्दीने स्वत:च्या पायावर उभी राहून अधिकारपदापर्यंत वाटचाल करते. पन्नास वर्षापूर्वीच्या पारंपरिक व्यवस्थेत ही गोष्ट अशक्य होती. पण डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने दलित स्त्री जागृत झाली होती. तिला आत्मभान आले होते. स्वत:च्या अस्तित्वाला अर्थ देण्याची कर्तृत्वक्षमता तिच्यात दिसून लागली होती. याची साक्ष शांताबाईच्या आत्मकथनांत मिळते. बेबी कांबळे यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनांत महार समाजाच्या जीवनाचे सर्वांगीण चित्र रेखाटले. चालीरिती, रूढी परंपरा, अंधश्रद्धा, उपासतापास, सतत आठवण करून देणारी भूक इ. तपशीलवार व सविस्तर माहिती लेखिका देते. मुक्ता सार्वगौड यांचे 'मिटलेली कवाडे' हे आत्मकथनही उल्लेखनीय आहे. संस्कारित मनाच्या एका समजसेविकेचे हे आत्मकथन आहे.

सर्वच दलित आत्मकथनकारांनी अनुभव चित्रित करताना कलात्मकता साधण्याचा प्रयत्न न करता आशय वाचकांना पोहचवण्याऱ्या प्रामाणिक प्रयत्न केला. दलित आत्मकथनकारांनी शैलीविषयी कोणतेही संकेत बाळगलेले नाहीत. 'अनुभवांची भाषा हीच या आत्मकथनांची शैली आहे. अंधारातून प्रकाशाकडे जाणारे मानवी मन यातून दिसते. दलित स्वकथनाच्या दृष्टीने १९७८ ते १९९८ हा कालखंड वैपुल्याचा म्हणता येईल.'

**सारांश :**

या प्रकरणात 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांतील सामाजिकता व सांस्कृतिकता लक्षात घेण्यासाठी प्रस्तुत विषयाचे महत्त्व, विशद करून दलित म्हणजे कोण ? दलित जाणीव म्हणजे काय ? दलित साहित्य म्हणजे काय ? या दलित साहित्याचे प्रेरणा, स्वरूप, प्रयोजन पाहून दलित आत्मकथनांची वाटचाल व स्त्रियांच्या आत्मकथनांचा थोडक्यात आढावा घेतला.

पुढील प्रकरणात 'माझ्या जल्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील सामाजिकतेचे स्वरूप पाहू.

-----

# संदर्भसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १) | जोशी, लक्ष्मणशास्त्री | : | 'निकाय', ऑक्टो.-सप्टे., १९७६, पृष्ठ ५. |
| २) | वानखेडे म.ना. | : | 'दलित साहित्य संमेलन', १९७६, पृष्ठ ६७. |
| ३) | ढसाळ नामदेव | : | 'मायमराठी', ऑगस्ट, १९७५, पृष्ठ ७७. |
| ४) | युक्रांद | : | 'धुकांदची मुलभूत भूमिका', १९७३. |
| ५) | मनोहर, यशवंत | : | 'दलित साहित्य संमेलन', नागपूर (निवेदन) |
| ६) | मुक्तिबोध, शरच्चंद्र | : | 'निकाय',दिवाळी अंक, पृ. ५२. |
| ७) | मुक्तिबोध, शरच्चंद्र | : | 'तत्रैव', पृ. ५२. |
| ८) | देशपांडे, गो.पू. | : | 'सत्यकथा' मार्च, १९७३, पृष्ठ ९. |
| ९) | बागूल, बाबुराव | : | 'उन्थानगुंफा' (प्रस्तावना), , पृष्ठ ७. |
| १०) | कुरूंदकर, नरहर | : | 'निकाय', एप्रिल, १९७६, , पृष्ठ ५९. |
| ११) | बागुल, बाबुराव | : | 'माय मराठी', ऑगस्ट, १९७५, , पृष्ठ १३. |
| १२) | जोशी, लक्ष्मणशास्त्री | : | 'निकाय', ऑगस्ट-सप्टेंबर, १९७६, , पृष्ठ ५. |
| १३) | नेसरकर, प्र.श्री. | : | 'माय मराठी', ऑगस्ट, १९७५, , पृष्ठ २६. |
| १४) | कुलकर्णी, आरती | : | 'दलित स्वकथने साहित्यरूप', विजय प्रकाशन. |
| १५) | जाधव, रा.ग. | : | 'दलित आत्मकथा काही विचार', अस्मितादर्श, , पृष्ठ ९१, ९२. |


-----